# भिरभिरणारं चंचल मन

भिरभिरणारं चंचल मन
कसं, अन् कुठं शोधायचं?
स्वछंद भटकणं हे कामच त्याचं
त्याला आपण, कशाला अडवायचं?...
भिरभिरणारं चंचल मन

आज इथे, तर उद्या तिथे
आता रानात, नंतर वनात
हळुवार आवाजात, सांगेल ते कानात
कशाला अडवतोस? मी जाणारच!
भिरभिरणारं चंचल मन

कधी रुसेल, कधी हसेल
कधी चिडेल, कधी रडेल
शांत झाल्यावर येईल ते लाडात
अन् हसत म्हणेल, भटकायला मी जाणारच!
भिरभरणारं चंचल मन

कधी फुलावर, कधी वाऱ्यावर
कधी नभावर, कधी ताऱ्यावर
बसून, मधुर आवाजात गाइल ते गाणं
नका अडवू मला, मी जाणारच!
भिरभिरणारं चंचल मन

– पद्माकर चित्रे
('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)